पुण्यनगरी

# विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचा भांडार असावा : जॉर्ज क्रूझ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी गौतम बुद्धांच्या अष्टांग मार्गाचे अवलंबन करणे गरजेचे आहे. तसेच विद्यार्थ्यांनी वाचन कौशल्य विकसित करण्यावर भर द्यावा. विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाचा भांडार असला पाहिजे, असे प्रतिपादन जॉर्ज क्रूझ यांनी केले. शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभागातर्फे आजादी का अमृतमहोत्सवानिमित्त व्यक्तिमत्त्व आणि कौशल्य विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी आपल्या आयुष्यात ज्ञानसाठा किती महत्त्वाचा आहे, याचे विवेचन केले. प्रास्ताविक अभिजित पाटील यांनी, तर आभार डॉ. प्रतिमा पवार यांनी मानले. कोमल ओसवाल यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास डॉ. प्रतिभा देसाई, आकाश ब्राह्मणे आदी उपस्थित होते.